MHAH230005162019

**नियमीत दिवाणी दावा क्रमांक २१४/२०१९ मधील**

**निशाणी क्र.६५ वरील आदेश**

[०१] प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. २३ शिवाजी गुलाब आढाव यांचे कायदेशीर वारस दाव्यात समाविष्ट करण्यासाठी दाखल केलेला आहे.

[०२] वादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तुत दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. २३ शिवाजी गुलाब आढाव हे दि.०७/०२/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. मयत प्रतिवादी क्र.२३ यांची मुले प्रतिवादी क्र. २० व २१ हे पुर्वीच दाव्यामध्ये सामील आहेत. परंतु, मयत प्रतिवादी क्र. २३ यांची पत्नी व मुलगी हे वारस दाव्यात समाविष्ट नाहीत. त्यांची नावे खालीलप्रमाणे असून त्याशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत.

२३ अ). शशिकला शिवाजी आढाव,
वय- ५५ वर्षे, धंदा-शेती,
रा. येवती, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.

२३ ब). आशा दिपक खेडकर,
वय- २५ वर्षे, धंदा-शेती,
रा. खेडकरमळा, देवदैठण, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.

[०३] प्रतिवादींनी अर्जाच्या पाठीमागील पानावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जावर योग्य तो आदेश पारीत करावा अशी विनंती केलेली आहे. तसेच, मयत प्रतिवादी क्र. २३ यांच्या वारसांना नोटीस बजावणी होऊन देखील ते अर्जाच्या कामी हजर न राहिल्याने प्रस्तुत अर्ज त्याच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात आला.

[०४] अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले.

[०५] दोन्ही बाजुच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

[०६] प्रतिवादी क्र. २३ शिवाजी गुलाब आढाव हे दि.०७/०२/२०२४ रोजी मयत झालेले निशाणी क्र. ७१ वरील मृत्यु प्रमाणपत्रावरुन दिसून येते. सदरचा दावा जाहिर ठराव व वाटप होऊन मिळणेबाबत दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यात मयत प्रतिवादी क्र. २३ यांच्या वारसांना वादीविरुध्द पुढे दावा चालविण्याची संधी देणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे सर्व कारणांचा विचार करता न्यायाचा हेतू साध्य करण्यासाठी मी खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

**(१)** अर्ज मंजुर करण्यात येतो.

**(२)** वादीने मयत प्रतिवादी क्र. २३ शिवाजी गुलाब आढाव यांच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करुन तशी दुरुस्ती या आदेशापासून पुढील तारखेपर्यंत प्रस्तुत दाव्यात करावी.

**(३)** वादीने दाव्यात योग्य ती दुरुस्ती केल्यानंतर दुरुस्ती दावा प्रत त्वरीत दाखल करावी.

**(४)** अर्जाचा खर्च वादीने सोसावा.

PATIL PRAVIN VISHWAS

Digitally signed by PATIL PRAVIN VISHWAS
Date: 2026.01.23 18:00:11 +0530

(प्रविण वि. पाटील)

दिनांक:- २३-०१-२०२६.

सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
श्रीगोंदा.

**-: <u>प्र मा ण प त्र</u> :-**

प्रमाणीत करण्यात येते की, या पी. डी. एफ. फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | एन.डी.दावत (श्रेणी-३) |
| न्यायालयाचे नांव | : | सह दिवाणी न्यायाधीश तथा<br>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, श्रीगोंदा,<br>ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर. |
| आदेश घोषित केल्याचा दिनांक | : | २३-०१-२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याचा दिनांक | : | २३-०१-२०२६ |
| आदेश अपलोड दिनांक | : | २३-०१-२०२६ |